INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 6 | JULY - 2022

# भारतीय रोजगार निर्मितीमध्ये सार्वजनिक उपक्रमांचे योगदान

डॉ. बाळासाहेब निर्मळ
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.



साधारणतः एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून राज्यांच्या कार्यक्षेत्रात वाढ होत गेली. औद्योगिक क्रांतीनंतरच्या कालखंडात समाजव्यवस्थेमध्ये झालेले व्यापक परिवर्तनामूळे राज्यसंस्थेला काही सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारणे अनिवार्य बनले. दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्ती नंतर समाजवादी विचारप्रणालीचा वाढता प्रभाव आणि कल्याणकारी राज्य संकल्पनेच्या उदयानंतर तर मानवी जीवनाच्या सर्वागिंण विकासाची जबाबदारी राजसत्तेवर येवून पडली. याबरोबरच आधुनिक काळात लोकांत घडून आलेल्या राजकीय जागृतीमूळे त्यांच्या राज्यसंस्थेकडून असणाऱ्या अपेक्षा मोठ्या प्रमाणावर वाढल्या त्यामूळे राजसत्तेचा प्रभाव आणि सर्व क्षेत्रात (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इ.) हस्तक्षेप करुन लोककल्याणकारी कार्य करण्यास सुरुवात झाली. राजसत्तेचा आर्थिक क्षेत्रातील भूमिकेने शासनव्यवस्थेवरील कार्याचा भार अधिक वाढला. यामध्ये प्रामुख्याने राज्यांचा औद्योगिक विकास साधण्यासाठी विविध उद्योगांची स्थापना, उत्पादन, व्यापार, वितरण, भांडवल पुरवठा, नियंत्रण इत्यादी भूमिका आणि जबाबदाऱ्या राज्याला पार पाडाव्या लागत आहेत. यासाठी प्रभावी प्रशासकीय यंत्रणा आणि संघटना बांधणीची आवश्यकता निर्माण झाली. या मधूनच राज्य निर्मित सार्वजनिक उपक्रमांची संकल्पना उदयास आली. राज्यातील विविध उद्योग व्यवसायावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक उपक्रमाचे प्रारूप अतिशय उपयोगी सिध्द झाले आहे.

विसाव्या शतकापासून व्यक्तीवादी विचार धारा मागे पडुन समाजवादी विचारधारा मान्यता पावली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 1952 च्या अहवालानुसार दुसऱ्या महायुध्दानंतर आशियातील स्वतंत्र झालेल्या 11 राष्ट्रांपैकी 9 राष्ट्रानी कोणत्या न कोणत्या रुपात समाजवादाचा स्वीकार केला आहे. या मागे कोणत्याही वादाच्या आकर्षणापेक्षा लवकर विकास साधण्याची इच्छाच दिसुन येते.[3] या समाजवादी विचारसारणीच्या मान्यतेबरोबरच राज्याचा कार्यक्षेत्रातही वृध्दी होत आहे. सामान्य जनतेच्या जीवनात तसेच राष्ट्राच्या उत्पादनात वृध्दी करावयाची म्हणजे सरकारला आर्थिक क्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय पर्याय नसल्यामुळे जगातील बहुसंख्य देशात विशेषकरून विसाव्या शतकामध्ये अविकसित व विकसनशिल राष्ट्रांनी देखील सार्वजनिक उपक्रम पध्दतीचा स्वीकार केला आहे.


सार्वजनिक उपक्रम पद्धतीमूळे शासकीय नियंत्रण आणि खाजगी क्षेत्रातील उपक्रम यांचा समन्वय साधून लोककल्याणकारी कार्य व राज्यातील जनतेला विविध सेवा उपलब्ध करुन देणे सोपे झाले आहे. त्यामूळे आधुनिक कालखंडात सर्वच राष्ट्रामध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या संख्येत वाढ झाली आहे. इंग्लंड, अमेरिका, या सारख्या भांडवलशाही राष्ट्रामध्ये देखील गेल्या शतकात सार्वजनिक उपक्रमांना अधिक महत्त्व देण्यात आले. भारतामध्ये आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय स्थापनेचा एक महत्त्वपूर्ण मार्ग, विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे महत्वूर्ण साधन म्हणून सार्वजनिक उपक्रमाकडे पाहिले गेले.[4] त्यामूळे सार्वजनिक उपक्रमांचा विकास, विस्तार करण्यासाठी सरकारने विविध धोरणात्मक निर्णय घेवून त्यास अधिक हातभार लावला. साहजिकच देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासामध्ये सार्वजनिक उपक्रमांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सार्वजनिक उपक्रम हे सरकारच्या आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीचे आणि रोजगार निर्मितीचे साधन आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात झपाट्याने औद्योगिक विकास आणि रोजगारांच्या विविध संधी निर्माण करण्यासाठी सरकारने सार्वजनिक उपक्रमांना केंद्रस्थानी ठेवुन मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणुक केली. या उपक्रमामधून अनेक प्रकारचा रोजगार उपलब्ध करण्यात भारत सरकार यशस्वी झाले आहे. मुलतः सार्वजनिक उपक्रम हे कौशल्याअधारित स्वरुपाचे असल्याने या उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची निर्मिती झाली आहे. देशामध्ये सार्वजनिक उपक्रमांचा झपाट्याने विस्तार होत असला तरी देशातील एकूण रोजगार निर्मितीमध्ये सार्वजनिक उपक्रमांचा वाटा घटत आहे. यांची माहिती तक्ता क्रं. 4.28. देण्यात आली आहे.

**तक्ता क्रं. 4.28.**

**सार्वजनिक उपक्रमातील कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या**

(संख्या लाखामध्ये)




**Source - Public Enterprises Survey-2013-*14.***

1951 नंतर देशात सार्वजनिक उपक्रमांच्या संख्यात्मक वाढीबरोबर त्या उपक्रमांतील रोजगार देखील वाढला आहे. 1964 मध्ये कार्यरत सार्वजनिक उपक्रमांत 4 लाख कर्मचारी कार्यरत होते त्यामध्ये वाढ होवून 1979

मध्ये 17 लाख आणि 1991 मध्ये 21.79 लाख कर्मचारी कार्यरत होते. म्हणजेच 1991 पर्यंत सार्वजनिक उपक्रमातील रोजगाराची संख्या सतत वाढताना दिसते. 1991-92 या वित्तीय वर्षानंतर भारत सरकारने सार्वजनिक उपक्रामातील अतिरिक्त मनुष्यबळ कमी करण्यासाठी विनानौकरशाहीकरन, अर्धवार्षिक, स्वैच्छासेवानिवृत्ती धोरणाचा स्वीकार, अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर आणि तोट्यातील व आजारी उपक्रम बंद करणे किंवा त्यांचे इतर उपक्रमामध्ये विलन करण्याची प्रक्रिया सुरु केल्याने सार्वजनिक उपक्रमातील रोजगाराची संख्या मोठ्या प्रमाणात घटत आहे.

2011-12 मध्ये 1446202 कर्मचारी कार्यरत होते. त्यामध्ये घट होवून 2013-14 मध्ये एकूण कार्यरत 234 केंद्रीय उपक्रमामध्ये 1349493 कर्मचारी होते. 2011-12 आणि 2013-14 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्याचा विचार करता 2014 मध्ये 96709 लोकांनी आपला रोजगार गमवावा लागला आहे. 2006-07 च्या तुलनेत 2013-14 मध्ये रोजगारात 16.29% घट झाली आहे. ही अत्यंत चिंतेची बाब मानली जाते. कारण यातील बहुतेक कर्मचारी हे कंत्राट आणि रोजनदारी स्वरुपाचे काम करत असून यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण आणि कौशल्य अवगत नाही त्यामूळे त्यांच्यासमोर दैनंदिन गरजा आणि ऊदरनिर्वाह चा प्रश्न निर्माण झाला आहे.

## सार्वजनिक उपक्रमातील रोजगारामध्ये महिलांचा सहभागः-

सार्वजनिक उपक्रमांची निर्मितीमधील प्रमूख उद्देशामध्ये देशात रोजगारांच्या विविध संधी निर्माण करणे आणि समाजातील सर्व स्तरातील घटकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यास सार्वजनिक उपक्रमांनी प्रमूख भूमिका आणि योगदान द्यावे अशी भूमिका सरकारची होती. त्यामध्ये सार्वजनिक उपक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले आहेत परंतु सार्वजनिक उपक्रमातील महिलांचा सहभाग आणि कार्यरत महिलांची संख्या अगदी नगण्य स्वरुपाची होती.

1980 मध्ये एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा वाटा फक्त 4% होता. परंतु 1993 नंतर भारत सरकारने सर्वच क्षेत्रात महिलांना रोजगारांच्या संधी निर्माण करण्यावर अधिक प्राधान्य दिले जात असून कामाच्या ठिकाणी महिलांना सर्व भौतिक सुविधा आणि कामांच्या ठिकाणी महिलांची होणारी पिळवणूक, महिलांवर होणारे अत्याचार आणि लैगिक शोषण रोखण्यासाठी विविध कायद्यांची निर्मिती केली असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी देखील केली जात आहे. 2013 च्या कंपनी कायद्यानूसार कंपण्याच्या संचालक मडळामध्ये महिला सदस्यांची नेमणूक बंधनकारक केली आहे. त्यामूळे सार्वजनिक उपक्रमात महिलांचा विविध स्तरावर सहभाग वाढत आहे. याची माहिती तक्ता क्रं. 4.29. मध्ये दिली आहे.

तक्ता क्रं. 4.29.

## सार्वजनिक उपक्रमातील रोजगारामध्ये महिलांचा सहभाग

| Group | Total No. Of Employees | | | Total Female Employees | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
| Managerial | 273331 | 275283 | 270539 | 25943 | 26462 | 26547 |
| Supervisors | 141674 | 139733 | 130345 | 9872 | 10136 | 12864 |
| Workers | 1031197 | 983514 | 948609 | 96314 | 92702 | 93517 |
| Total | 1446202 | 1398530 | 1349493 | 132129 | 129300 | 132928 |

**Source - Public Enterprises Survey 2013 *-14.***

तक्ता क्रं. 4.29. चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, 2011-12 मध्ये सार्वजनिक उपक्रमात एकूण 1446202 विविध श्रेणीतील कर्मचारी कार्यरत होते. महिलांची संख्या 132129 होती. यामध्ये व्यवस्थापक श्रेणीतील महिला कर्मचाऱ्यांची संख्या एकूण कार्यरत संख्येच्या 9.49% तर पर्यवेक्षक श्रेणीतील 6.97% कामगार श्रेणीतील महिला कर्मचाऱ्यांची संख्या 9.34% होती. यामध्ये 2013-14 मध्ये सार्वजनिक उपक्रमातील कार्यरत कर्मचाऱ्याची संख्येत घट होवून 1349493 झाली.

परंतु महिला कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ होवून ती संख्या 132928 होती. म्हणजेच 2011-12 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यामध्ये महिलांचा वाटा 9.14% वरुन 2013-14 मध्ये 9.84% इतका आहे म्हणजेच यामध्ये 0.67% वाढ झाली आहे. याचे श्रेणीनिहाय विश्लेषण केले असता व्यवस्थापकीय श्रेणीत 0.32% पर्यवेक्षण श्रेणीत 2.9% तर कामगार श्रेणीत 0.52% वाढ झाली आहे. यावरुन असे दिसून येते की 1991 नंतर सार्वजनिक उपक्रमातील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट होत असताना एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत महिलाचा सहभाग वाढत असून हे प्रमाण सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या उपक्रमांत अधिक आसल्याचे दिसून येते. उपक्रम निहाय सार्वजनिक उपक्रमांतील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्यांचा विचार करता 2004-05 पासुन भारत दुरसंचार निगम लिमिटेडमध्ये सर्वाधिक कर्मचारी कार्यरत असून 2013-14 मध्ये देखील तो अव्वल स्थान कायम आहे. 2004-05 मध्ये या उपक्रमात 339853 कर्मचारी कार्यरत होते तर 2013-14 मध्ये 238277 कर्मचारी कार्यरत आहेत म्हणजेच 101576 लोकांचा रोजगार कमी झाला आहे.

परंतु सार्वजनिक उपक्रमामधील कार्यरत कर्मचाऱ्यांवरील वेतन आणि मजुरीवरील खर्चाच्या प्रमाणात सतत वाढ होत आहे. 2006-07 मध्ये एकूण सार्वजनिक उपक्रमात 16.14 लाख कर्मचारी कार्यरत होते. त्यांच्या वेतन आणि मजुरीवरील एकूण खर्च 52586 करोड रुपये होता. त्यामध्ये वाढ होवून 2013-14 एकूण 13.51 लाख कर्मचाऱ्यांवर 121038 कोटी रु. खर्च झाला आहे. म्हणजेच या खर्चात 2006-07 च्या तुलनेत 130% वाढ झाली आहे. तसेच एकूण कार्यरत कर्मऱ्यामागे सार्वजनिक उपक्रमांची उपलब्धीमध्ये देखील वाढ झाली आहे. 2006-07 मध्ये प्रति व्यक्ती उपलब्धी 325869 रु. होती. ती 2013-14 मध्ये 888305 रु. इतकी वाढली आहे. म्हणजेच 2005-06 च्या तुलनेत ही वाढ 172% आहे.

यावरुन असे दिसून येते की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात रोजगाराची निर्मिती करण्यात सार्वजनिक उपक्रमांनी महत्वाची भूमिका बजावली असली तरी 1991 मध्ये हेच सार्वजनिक उद्योग त्यांच्याकडील अतिरिक्त श्रमशक्तीमूळे

ओळखले जावु लागले. त्यामूळे सरकारने या उपक्रमामध्ये विनानोकरशाही करणाची प्रक्रिया राबविण्यात येत असून सार्वजनिक उपक्रमातील रोजगारात घट होत असली तरी सार्वजनिक उपक्रमांचा कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन आणि मजुरीवरील खर्चात वाढ 2006-07 च्या तुलनेत 130% वाढ झाली आहे. या वाढीमधील 30% निधी हा व्यवस्थापकीय क्षेणीच्या कर्मचाऱ्यांवर होत आहे. त्याबरोबरच प्रति व्यक्तीच्या उपलब्धीमध्ये देखील 172% वाढ झाली आहे. भारतीय सार्वजनिक उपक्रमामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या जमेची बाजु म्हणजे 2009 पासुन अमेरिकेमध्ये निर्माण झालेली जागतिक मंदी दृष्य परिस्थितीमुळे जगभरातील विविध आंतरराष्ट्रीय उद्योग समुहांनी उत्पादन प्रक्रिया थांबल्याने या उद्योग समुहानी मोठ्या प्रमाणात विनानोकरशाही करणाची प्रक्रिया राबविल्याने मोठ्याप्रमाणात लोकांना बेरोजबार होण्याची वेळ आली असून या पार्श्र्यभुमिवर भारतीय सार्वजनिक उपक्रमांनी कार्यरत कामगार आणि कर्मचारी वर्गाचे हितसंबध जोपासण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भ ग्रंथः


1) कटारिया सुरेन्द्र (2007),आर्थिक नीती एवं प्रशासन, मलिक एण्ड कम्पनी जयपूर,.
2) देसाई स. श्री. मु., भालेराव निर्मल (1998) भारतातील औद्योगिक अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.,
3) Choudhary C.M. (2004), Dynamics Of Indian Economy, Sublime Publication, Japur,
4) Public Enterprises Survey – 2013 -14.
5) शर्मा टी.आर., वाष्णेय जे.सी., सिंहल मोहन (2007), विकास का अर्थशास्त्र एंव नियोजन, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा.
6) Mathur, B.L. Mathur Reeta (2010) ‘Accountability And Autonomy Relationship In Central Public Sector Enterprises In India Through Memorandum Of Understanding’, InternationalConferenceOnAppliedEconomicIcoaeHttp://Dpe.Nic.In/Sites/Upload_Files/Dpe/Files/Pesurvey_13_14/Val1/Chapter_
7) Mathur B. P. (1999), Public Enterprises Management, Macmillan Business Book
8) Singh Bishwa Nath (1991), Public Enterprise In Theory And Practice, Deep & Deep Publications, New Delhi,
9) Http://Dpe.Nic.In/Sites/Upload_Files/Dpe/Files/Pesurvey_13_14/Val1/Chapter_6_Organisational_Structure_And_Hrm.